0 4 JAN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कृष्णात खोत यांच्या यशाचा अभिमान

## कुलगुरू डॉ. शिर्के; साहित्य अकादमी पुरस्काराबद्दल गौरव

कोल्हापूर, ता. ३ : 'शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी म्हणून आणि कोल्हापूरचे सुपुत्र म्हणून आपणास मिळालेल्या यशाचा आम्हाला अतिशय अभिमान वाटतो', अशा शब्दांत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिक कृष्णात खोत यांचा गौरव केला.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मंगळवारी सायंकाळी श्री. खोत यांच्या फुलेवाडी येथील निवासस्थानी भेट घेऊन त्यांचे ग्रंथभेट आणि अभिनंदनाचे पत्र प्रदान करून गौरव केले. त्यावेळी ते बोलत होते. खोत यांच्या 'रिंगाण' या



कोल्हापूर : कृष्णात खोत यांचा ग्रंथभेट व अभिनंदनाचे पत्र देऊन गौरव करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. नंदकुमार मोरे व सौ. खोत.

कादंबरीला नवी दिल्ली येथील साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. निसर्ग आणि मानव यांच्यातील सहसंबंधांची जागा जर स्पर्धेने किंवा युद्धाने घेतली, तर त्या युद्धात मानव कधीही जिंकू शकणार नाही. त्याचप्रमाणे पाळीव जनावरांमध्ये जर पुन्हा वन्य होण्याच्या शक्यता आजही असतील, तर माणसातील जनावर सुद्धा कधीही हिंस्त्र होण्यासाठी आसुसलेले राहील, याचीही शक्यता दाट आहे, याचे सूचनच 'रिंगाण'मधून अत्यंत प्रत्ययकारितेने केले आहे. ते आपल्यातल्या माणूसपणाला आवाहन करणारे असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी खोत यांनी कृतज्ञ भावना व्यक्त केल्या. कुलगुरू डॉ. शिर्के यांना पुस्तक भेट दिले. यावेळी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JAN 2024
लोकमत



शिवाजी विद्यापीठात सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते फुले यांना अभिवादन केले. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, प्राध्यापक उपस्थित होते.

# विद्यापीठात फुले जयंती

कोल्हापूर : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बुधवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी केली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनाच्या प्रवेशद्वारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. विद्या चौगुले, डॉ. कविता वड्राळे उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठात सावित्रीबाई फुले जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JAN 2024
सकाळ

## शिवाजी विद्यापीठ

मुख्य प्रशासकीय भवनाच्या प्रवेशद्वारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
04 JAN 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघाची निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मुंबईतील एचएसएनसी विद्यापीठाच्या वतीने सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाचा ६-० असा पराभव केला. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या संघाची जालंधर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



सामन्याच्या २० व्या मिनिटाला शिवाजी विद्यापीठाच्या रोहित पोवारने मोठ्या डी बाहेरून मारलेला फटका गोल्ड पोस्टमध्ये आदळला. तर २५ व्या मिनिटाला कर्णधार प्रथमेश हेरकरने गोल नोंदवत शिवाजी विद्यापीठ संघाला २-० अशी आघाडी मिळवून दिली. उत्तरार्धात आदित्य कल्लोळी व प्रथमेश हेरेकर यांनी गोल नोंदवत ४-० अशी आघाडी मिळवून दिली. प्रभू पोवारने ५७ व्या मिनिटाला गोल केल्याने शिवाजी विद्यापीठाला ६-० अशी भरभक्कम आघाडी मिळाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाला एकही गोल करता आला नाही. शिवाजी विद्यापीठ संघात स्वयम साळोखे, ऋतुराज संकपाळ, ऋतुराज सूर्यवंशी, तेजस शेळके, प्रथमेश हेरेकर, प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे, व्यवस्थापक डॉ. शिवराज गायकवाड, यश देवणे, विशाल पाटील, साहिल खान, यशराज कांबळे, रोहित यांचा समावेश होता.